# सोनचाफा



लहानपणी आईबरोबर कोणाकडे तरी हळदीकुंकवाला गेले की शेवंती, ॲस्टरचे फूल किंवा मोगऱ्याचा गजरा मिळायचा. पण एकदा कोणाकडे तरी सोनचोफ्याचे फूल मिळाले आणि मला काय आनंद झाला! ते सोनेरी, सुंदर फूल हातात घेतांना मला एकदम श्रीमंत झाल्यासारखे वाटले. नेहमी दिसायची नाहीत ना ती फुलं! झाड तर कुठे जवळपास पाहिलंच नव्हतं. इतका सुंदर वास असतो ह्या फुलांना, पण तेव्हा गैरसमज होता ह्या झाडाबद्दल! ह्या वासामुळे नाग येतात झाडाजवळ, म्हणून घराजवळ फारसं कोणी हे झाड लावत नव्हते. फूल हातात घेतले पण वेणीत घालणार कसे? छोटंस, थोडं जाडसर देठ असतं ना.. हेअरपिनेत नीट अडकत नाही. त्या काकूंकडे सेफ्टिपिन मागितली. मग त्यात अडकवून घालता आलं ते. नंतर किती तरी दिवस ते फूल सुकल्यावरही माझ्या वहीत होतं आणि दप्तर उघडलं की छान वास यायचा!

ही फुलं फक्त २/३ महिने पावसाळ्यात येतात. फुलं पानांच्या बेचक्यात, उंच, उंच येतात. काढणं कठीण असतं. लांब काठी घेऊन किंवा झाडावर चढून, किंवा वरच्या फांद्यांना दोरी बांधून, ती हलकेच ओढून, वाकवून, फुलं काढली जातात. देवळांत, शाळेत, शेतात, बांधावर ही झाडं जास्त लावली जातात.

काही वर्षांपूर्वी तिरूपतीला जायचा योग आला होता. आमची जिथे रहायची सोय होती, त्याच्या आजूबाजूला खूप सोनचाफ्याची झाडं होती. आणि फुलांनी लगडली होती. खरं म्हटलं तर खूप

घमघमाट असायला हवा होता. पण तसा नव्हता. ती झाडं फारशी उंच नव्हती. त्यामुळे परवानगी घेऊनच, आम्ही भरपूर फुलं तोडली त्याची, अगदी समाधान होईपर्यंत!मग कोणी तरी सांगितलं, हल्ली सोनचाफ्याची कलमी झाडं सर्वत्र असतात. ती कटींग करून उंच वाढू देत नाहीत. आडव्या फांद्या वाढू देतात आणि लवकर एक दोन वर्षांत खूप फुलं देतात. अगदी वर्षभर !

सोनचाफा ..आपला भारतीय वृक्ष! सुवर्ण चंपक ही म्हणतात ह्या फुलांना! सोन्यासारखा, पिवळा, सुंदर रंग असतो ना ह्या फुलांचा! आपल्या प्राचीन साहित्यात, आयुर्वेदात ह्या झाडांचा उल्लेख सांपडतो. कायम हिरवा गार दिसणारा उंच वृक्ष, खूप सावली देणारा! मोठी, नागमोडी कडा असलेली, हिरवी गार ...दाट पानं असलेला!

आपण सोनचाफ्याचे फूल म्हणतो ...पण खरं तर ती कळी असते.

एकच फूल पानांच्या बेचक्यात येते. पाकळ्या लांब आणि टोकदार असतात. फुलांत एक डौल असतो, अनोखे सौंदर्य असते, पाहून प्रसन्न वाटते.

ह्या फुलांत १५ ते २० पाकळ्या असतात. खरं तर पाकळ्या आणि फुलाचा बाहेरचा भाग (म्हणजे Calyx, आणि Corolla) असतो त्यांत. फूल पूर्ण उमललं की अगदी फताडं होतं आणि लगेच त्याच्या पाकळ्या गळतात.

मग आतल्या भागाचे फळांचे घोस होतात. त्या प्रत्येक सुकलेल्या फळातून २ बिया मिळतात.

बिया लावलेल्या झाडांना फुलं यायला १०/१२ वर्ष लागतात. या झाडांना सूर्यप्रकाश जास्ती लागतो. झाडांच्या किंवा बिल्डिंग्जच्या गर्दीमुळे तो पुरेसा मिळत नसला तर तो मिळवण्यासाठी, हे झाड उंच वाढते. पाणी निचरा होईल अशी जमीन लागते. पावसाळयात बुंध्याशी पाणी जमा होणार नाही हे मात्र पहायला लागते. नाहीतर झाड मरू शकतं. तपमान १० ते ४० सें. मध्ये असले म्हणजे झाले. मग फारशी काळजी घ्यावी लागत नाही झाडाची. शेणखत, जीवामृत, कंपोस्टखत मधून मधून वापरले जाते. ह्या झाडाला कीड लागत नाही. ह्याचे लाकूड अगदी टिकावू असते. खेळणी, फर्निचर बनवायला उपयोगी पडते. पेन्सिल, विमान, जहाज बांधणीत वापरतात. फुलांपासून अत्तर, साबण, तेल बनवतात. फुलांचा आणि पानांचा रंग कपडे रंगवण्यासाठी वापरतात. सोनचाफ्याचा उपयोग औषधातही करतात.

आपल्या साहित्यात स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन करतात, तेव्हा नेहमी पाणीदार, हरणासारखे डोळे, आणि चाफेकळी नाक, गुलाबी नाजूक जिवणी, लांबसडक केस असे करतात. नाकासाठी नेहमी चाफेकळी हेच विशेषण असते.

सोनचाफ्याच्या गडद पिवळा, गडद केशरी, पांढरा, फिकट पिवळा अशा छटा आहेत. दीर्घकाळ

उत्पन्नाच्या दृष्टीने फायदेशीर असलेल्या गडद पिवळ्या सोनचाफ्याला अधिक पसंती दिली जाते. वर्षभर फुले देणारी ही जात असल्याने शेतक-यांनाही वर्षभर नगदी उत्पन्न मिळू शकते.

शहापुरातील मानस रुरल इन्स्टिट्यूशनने मूळ झाडांवर कलमे करून कमी उंचीच्या झाडांची जात विकसित केली आहे. कलमांची झाडं मोठ्या कुंडीतही लागू शकतात.

कुडाळ जवळचे वेलणकर आहेत त्यांनी प्रयोग करून "वेलणकर चाफा "नावाचा नवीन पिवळा चाफा विकसित केला आहे. त्याची कलमे करून ते विकतात. त्यांच्या कलमाला बाराही महिने फुलं येतात.

पालघरचे नितिन पवार सोनचाफ्याची शेती करतात.

तज्ञ सांगतात कलमाच्या झाडांवर रोजची ८/१० फुलं असतात. कलमाचे एक झाड वर्षाला २२०० ते २५०० फुलं देते. ह्या फुलांना मोठी बाजारपेठ उपलब्ध असते. म्हणून मोठ्या प्रमाणात, काही एकरात सोनचाफ्याची शेती हल्ली केली जाते. सुवर्ण चंपक नांव असलेले हे फूल मग खरोखरच, वर्षाकाठी ५ ते १० लाख उत्पन्न मिळवून देते.

पन्हाळ गडाच्या जवळपास सोनचाफ्याची बहरलेली खूप रोपं दिसतात. छत्रपती शिवाजीमहाराजांनी श्रावणात गडावरच्या सोमेश्वराला एक लाख सोनचाफ्याची फुलं वहाण्याचा संकल्प केला होता.त्यासाठी त्या परिसरांत सोनचाफ्याची लागवड केली गेली होती.

ह्या फुलांच्या माळा करतात ...देवाला वहाण्यासाठी! पण असं वाचनांत आले आहे की विष्णूला वहातात, पण शंकराला नाही वहात.

श्रावणात गोव्याला ह्या फुलाच्या वेण्या मिळतात. त्या बायका केसात घालतात! हौशी बायका क्रेप कागदाची फुलं करून त्याचा हार करतात.

ही फुलं टिकवली जातात. तुरटी आणि पाणी (१:९) प्रमाणात घेऊन बाटलीत भरून एक दिवस तसेच ठेवतात. मग गाळून घेतात. काचेच्या लहान तोंडाच्या बाटलीत, आधी फुलं आणि नंतर पाणी घालून बाटली भरतात. ती हवाबंद करतात. बूच लावून लाखेनी किंवा व्यवस्थित टेप लावून बंद करतात. अशा बाटलीतली फुलं ४० वर्ष सुध्दा जशीच्या तशी राहू शकतात. हा ही व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जातो.

अशी बाटली जर कां तुम्हाला अनपेक्षित मैत्रिणीकडून भेट मिळाली तर ती अनमोल भेट असते. मला अशी भेट मिळाली आहे. एखाद्या मैत्रिणीने तिच्या बागेतल्या सोनचाफ्यांच्या फुलांचा फोटो जरी पाठवला, तरी त्याचा सुवास आपल्यापर्यंत पोहोचतो.

कोणी ती ओंजळीत धरून आपल्याला दिली, किंवा वाढदिवसाला परडीत घालून ती भेट दिली

तर त्याच्या वासाने, दर्शनाने दिवस चांगला जातो. ती भेट देणाऱ्याची प्रेमाची, कृतज्ञतेची भावना, थेट आपल्या हृदयापर्यंत पोहोचते.

तर असा हा सोनचाफा….. आसमंतात दरवळणारा , मनात घर करणारा!

**………चित्रा मेहेंदळे**

---------------------------------------------------------------



मागच्या पावसातला माझा अनुभव वेगळा होता.

मला नाही पावसात झाडांचं भिजणं, आणि त्यांचं स्नान सुखावलं. सकाळी उठल्यावर एकंदर हवा पाहून मलाही वाटलं…पहिला पाऊस.. भजी करावीत..
केलीही..पण त्यातला आनंद नाही घेऊ शकले.

आमच्या बिल्डिंगच्या मागे एक सोनचाफ्याचे झाड आहे. कालच मी त्याचा फोटो काढला होतां. खूप फुलं दर वर्षी लागतात. आम्हाला चौथ्या मजल्याच्या गॅलरीतून समोर नेत्रसुख देतात. पण कधी काढताही येत नाहीत फुलं आणि त्यांचा वासही येत नाही.

काल सकाळी भजी खात असतांनाच, इतका वारा होता, आणि ते झाड इतकं, घुमत होतं आणि आमच्या गॅलरीच्या जवळ येत होतं, की अस्वस्थ झालो आम्ही ते पाहून. मागची सगळीच झाडं गदागदा हालत होती.

आम्ही गमतीत म्हटलं पण जरा आणखी जवळ आलं तर फुलं काढता येतील.

झाडांना आपल्या मनातलं कळतं का? तुमचा विश्वास बसणार नाही, पण विलक्षण अनुभव आला मला.. संध्याकाळी ४ वाजेपर्यंत झाड झुंज देत होतं वाऱ्याशी! परत जेव्हा सोसाट्याचा वारा सुरू झाला तेव्हा खरंच त्यातली फुलं असलेली फांदी अगदी आमच्या जवळ आली. आणि आम्ही एक फूल आणि एक कळी काढली.

त्याचे फोटो काढतं असतांनाच ते झाड कोसळले, आणि बिल्डिंगवर पडले. रेस्ट झाले.

इतका सुरेख वास आहे फुलाला.. जातांना जणू आमची इच्छा ओळखून, आम्हाला फूल, आणि वास, आठवणीसाठी देऊन झाड पडले!

ते पाहून मी खूपच भारावून गेले आहे.

काय म्हणाल ह्या अनुभवाला?

बिच्चारी झाडं! आपण नाही त्यांना वाचवू शकत, अशा नैसर्गिक आपत्तीत!

झाडं नेहमीच पावसांत पडतात, वृक्षप्रेमी, त्यांची काळजी पण जमेल तेव्हढी घेतात. पण आपलं वर्षानुवर्ष समोर असलेलं झाड, असं पडतांना पाहून, खूप वाईट वाटतं, इतकं खरं!

**…….चित्रा मेहेंदळे**